Shri Shivaji ShikshanPrasarak Mandal Barshi's

# Karmaveer Mamasaheb Jagdale Mahavidyalaya, Washi

Tal- Washi, Dist- Osmanabad(MS)



## 7.3.1 - ACTIVITIES CONDUCTED RELATED TO DISTINGTIVENESS IN THE YEAR

| Year | Date | Activity | No. of Participant |
|---|---|---|---|
| 2022-2023 | 24/12/2022 | Student counseling by Dr.Vitthal Kashid | 41 |
| | 23/01/2022 | Shram Sanskar shibir | 110 |
| | 01/03/2023 | Lecture on Student counseling by Dr.R.V.Kathare | 45 |
| | 10/03/2023 | Student counseling camp | 35 |

Principal
Karmveer Mamasaheb Jagdale
Mahavidhyalaya Washi Ta Washi Dist.O,bad

22-23 7.3.1

पुण्य नगरी

# जगदाळे महाविद्यालयाचे रासेयो शिबीर उत्साहात

पुण्य नगरी। वृत्तसेवा



वाशी : शहरातील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने गोलेगाव येथे आयोजित रासेयो शिबिराचे उद्घाटन निवृत्त प्राचार्य डॉ. सूर्यकांत जगदाळे यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे तर प्रमुख उपस्थितीत सरपंच शकुंतला मराळे, उपसरपंच विजय कागदे, शिवाजी पाटील, सोसायटीचे चेअरमन विठ्ठलराव चौधरी, ग्रामसेवक सुरेखा कदम, समाधान मराळे, मुख्याध्यापक मुकुंद मेदने, विनायक घुले, संजीवन कागदे, किरण कागदे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी प्रा. कुंडलिक गुंड, सूत्रसंचालन प्रा. एम. डी. उंदरे यांनी तर आभार प्रा. राजाभाऊ बनसोडे यांनी मानले. कार्यक्रमासाठी प्रा. आर. एन. बनसोडे, प्रा. के. डी. गुंड, डॉ. अनंत पाटील, डॉ. दैवशाला रसाळ, डॉ. चेतना जगताप, प्रा. महादेव उंदरे यांनी परिश्रम घेतले.

Smart Osmanabad Edition
Jan 29, 2023 Page No. 4
Powered by : eReleGo.com

7.3.1

सकाळ

# विद्यार्थ्यांच्या संस्कारात 'रासेयो'चे योगदान

## सुधीर माने ; गोलेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप

वाशी, ता. ३ (बातमीदार) : विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरामधील संस्कार जीवनाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर उपयोगी पडत असतात. त्यामुळे हे शिबिर म्हणजे एक संधी समजून प्रत्येकाने त्याचे सोने करणे गरजेचे असल्याचे मत सुधीर माने यांनी व्यक्त केले. गोलेगाव (ता. वाशी) येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिर समारोप प्रसंगी गुरुवारी (ता. दोन) प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रविंद्र कठारे यांची उपस्थिती होती.

यावेळी सरपंच शकुंतला मराळे, उपसरपंच विजय कागदे, सदस्य समाधान मराळे, ग्रामसेवक सुरेखा कदम,



वाशी : राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मार्गदर्शन करताना प्रा. सुधीर माने.

प्रवीण पाटील, पशुधन अधिकारी सुरेश कागदे, मुख्याध्यापक मुकुंद मदने, रामदास चौधरी हरिश्चंद्र कागदे यांच्यासह विद्यार्थी, ग्रामस्थ यांची उपस्थिती होती.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने गोलेगाव (ता. वाशी) झालेल्या सात दिवसीय ग्रामस्वच्छता, योगासने, विविध विषयावर व्याख्याने, आरोग्य चिकित्सा, महिला मेळावा आदी उपक्रम घेण्यात आले.

शिबिरात प्राचार्या डॉ. कुसुम मोरे, प्रा.महेंद्र चंदनशिवे, अशोक पाटील, विश्वास उंदरे, डॉ. डी. टी. बाबर, एस. बी. चौधरी, डॉ. कल्याणकर, ज्योती कागदे, एस. पी चव्हाण आदी मान्यवरांनी सात दिवसात वेगवेगळ्या विषयावर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी प्रा. के. डी गुंड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी आर. एन बनसोडे, के. डी. गुंड, ए. एन पाटील, दैवशाला रसाळ, डॉ. चेतना जगताप, प्रा. शहाजी चेडे यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचलन प्रा. एम. डी उंदरे यांनी केले. तर आभार प्रा. राजाभाऊ बनसोडे यांनी मानले.

Aurangabad, OsmanabadToday
04/02/2023 Page No. 4

दै. लोकमत 04/02/2023

7.3.1

# श्रमसंस्कार शिबिरास सामाजिक उपक्रमांची जोड

## आरोग्य तपासणी, शेतीविषयी मार्गदर्शन

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशी : येथील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद याच्या संयुक्त विद्यमाने वाशी तालुक्यातील गोलेगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रम संस्कार शिबिर झाले. याचा समारोप प्रा. सुधीर माने व प्राचार्य डॉ. रवींद्र कठारे यांच्या उपस्थितीत झाला.

याप्रसंगी सरपंच शकुंतला मराळे, उपसरपंच विजय कागदे, ग्रामपंचायत सदस्य समाधान मराळे, ग्रामसेवक सुरेखा कदम, तंटामुक्ती अध्यक्ष प्रवीण पाटील, पशुधन अधिकारी सुरेश कागदे, मुख्याध्यापक मुकुंद मदने, रामदास चौधरी, हरिश्चंद्र कागदे यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरादरम्यान ग्रामस्वच्छता, योगासने, विविध विषयावर उदबोधनपर व्याख्याने, पशुचिकित्सा, आरोग्य चिकित्सा, महिला मेळावा आदी उपक्रम घेण्यात आले. याप्रसंगी प्रा. चंदनशिवे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेची ध्येय व उद्दिष्टे यावर आपले विचार व्यक्त केले, तर विश्वास उंद्रे यांनी नैसर्गिक शेती या विषयावर मार्गदर्शन केले. डॉ. डी. टी. बावर, डॉ. एस. बी. चौधरी, डॉ. कल्याणकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी गोलेगावमधील ३० जनावरांची चिकित्सा करून गोचीड निर्मूलन गर्भतपासणी लम्पी आजार याविषयी मार्गदर्शन केले. प्रा. अशोक पाटील आणि ज्योती अंकुश कागदे यांनी संत साहित्याची सामाजिक फलश्रुती याविषयी मार्गदर्शन केले.

आरोग्यचिकित्सा शिबिरामध्ये ग्रामीण रुग्णालयातील कर्मचाऱ्यांनी गावातील ७५ रुग्णांची तपासणी करून औषधोपचार केले. मंडळ कृषी अधिकारी एस.पी. चव्हाण यांनी शासनाच्या कृषी विभागाकडील विविध योजनेविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन कार्यक्रम अधिकारी प्रा. के.डी. गुंड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. एम.डी. उंदरे यांनी केले, तर आभार प्रा. राजाभाऊ बनसोडे यांनी मानले. शिबिरासाठी कार्यक्रम अधिकारी प्रा. आर. एन बनसोडे, प्रा. के. डी. गुंड, प्रा. डॉ. ए. एन. पाटील, प्रा. डॉ. दैवशाला रसाळ, प्रा. डॉ. चेतना जगताप, प्रा. महादेव उंदरे, प्रा. शहाजी चेडे यांनी परिश्रम घेतले. दरम्यान, या शिबिरास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

22-23 7.3.1

# मनुष्याच्या निरोगी जीवनासाठी व्यसनमुक्ती आवश्यक-डॉ. तांबारे

## मामासाहेब जगदाळे महाविद्यालयात व्यसनमुक्ती प्रबोधन



पुण्य नगरी । वृत्तसेवा

वाशी: मनुष्याच्या निरोगी जिवनासाठी व्यवसनमुक्ती आवश्यक आहे, असे प्रतिपादन डॉ. संदीप तांबारे यांनी केले.

शहरातील कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयामध्ये समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव, यश मेडिकल फाऊंडेशन वेरमाळा आणि कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गां[illegible] जयंतीनिमित्त व्यसनमुक्ती सप्ताहांतर्गत २ ते ८ ऑक्टोबर या काळात प्रबोधन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.रविंद्र कठारे तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. संदीप तांबारे , रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. कुंडलिक गुंड, प्रा. डॉ. आनंद करडे, डॉ. अनंत पाटील, प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. संदीप तांबारे म्हणाले, देशामध्ये लाखो लोक व्यसनाच्या आहारी गेले आहेत. दारू, गुटखा, तंबाखू या प्रमाणेच मोबाईलचा अतिरेकी वापर होत आहे. सर्वांनी जीवनाकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलण्याची गरज निर्माण झाली आहे. रोज कोणाच्या न कोणाच्या चेहऱ्यावर आपल्यामुळे हसू निर्माण झाले पाहिजे हा दृष्टिकोन ठेवणे गरजेचे आहे. सर्वांनी व्यसनमुक्त जीवन जगणे आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमाच्या अनुषंगाने निबंधासाठी महाविद्यालयाच्या अंजली सारून, साक्षी भारट, संचिता ढेपे यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वाक्षरीने मिळालेल्या प्रशस्ती पत्राचे वितरण करून सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. कठारे म्हणाले , व्यसनाधिनतेकडे वळलेल्या व्यसनी लोकांना त्यापासून प्रवावृत्त करणे गरजेचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी व्यसनमुक्तीचे दूत म्हणून काम करावे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. महेंद्रकुमार चंदनशिवे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. महादेव उंदरे तर प्रा.आनंद करडे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. अजित तिकटे, प्रा. राजेश उंदरे, प्रा.बी.आर घाटे, दत्ता फुले सुजीत ढेपे, अक्षय गिरी यांनी परिश्रम घेतले.